# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/12/2022 (शनिवार) दुपार

---

## दुखापत

१) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील गाडेघाट रोड पिपरी कन्हान येथे दिनांक २९/१२/२०२२ चे ०७.०० वा. ते ०७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– विमल शंकरलाल बर्मन, वय ३४ वर्ष, रा. वार्ड नं २ पिंपरी कन्हान ता. पारशिवनी हे गाडेघाट रोडवरील चौकात बसुन असताना फिर्यादीने मित्र अरविंद याला म्हटले की, या भिकारी चौकात आपण नाही बसु आपण दुसरीकडे जावु असे फिर्यादीने मित्राला म्हटले असता चौकात हजर राहणारा आरोपी नामे– अमरदिप उर्फे डमरु, रा. पिपरी कन्हान याने रस्त्याच्या बाजुला पडलेल्या सिमेंटच्या पन्न्याच्या तुकडयाने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केले व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली आरोपी हा नेहमी फिर्यादी सोबत वादविवाद करत असतो असे फिर्यादीचे रिपोर्टवरून सदर गुन्हा नोद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जैलाल सहारे ब. नं. १६८ पोलीस स्टेशन कन्हान मो. नं. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा दोडकी येथे दिनांक २८/१२/२०२२ चे २०.०० वा. ते २२.३० वा. दरम्यान चे सुमारास फिर्यादी नामे– विनोद देवराव झोडे, वय ४२ वर्ष, रा. दोडकी व आरोपी नामे– मनोहर गंगाधर नेहारे, वय ३५ वर्ष, रा. दोडकी हे घराशेजारी राहत असुन यातील आरोपी यांचे त्याचे पत्नी सोबत झगडा भांडण सुरू होते तेव्हा फिर्यादी हे झगडा भांडण सोडविण्यास गेले असता आरोपी यांच्या हातात असलेली लाकडी काठी फिर्यादी यांच्या डोक्यावर मारली व फिर्यादी यांना जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दारासिंग राठोड, ब. नं २०४८ मो. क्र. ९८६०४२७९०२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर